**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**

मध्यवर्ती कार्यालय : हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,

सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, मुंबई - ४०० ०१३.

दूरध्वनी : ०२२-६९३२८१०८ ; ई मेल : mlwbcivil@gmail.com

जा.क्र.मका/बांधकाम/२०२६/ ११०

दिनांक : २८/०७/२०२६

## जाहीर प्रगटन

**विषय : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालय, प्रभादेव मुंबई येथील उद्वाहन क्र.१ (Old/Geared Lift) च्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती कामासाठी दरपत्रके मागविण्याबाबत.**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालय, प्रभादेवी, मुंबई येथील नवीन प्रशासकीय इमारतीमधील उद्वाहन क्र.१ (Old/Geared Lift) च्या Semi Comprehensive Annual Maintenance Contract(AMC) करिता खालील अटी व शर्तीनुसार नोंदणीकृत व पात्र ठेकेदारांकडून बंद लिफाफ्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालय, प्रभादेवी, मुंबई येथील उद्वाहन क्र.१ च्या (Old/Geared Lift) च्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती कामासाठी बंद लिफाफ्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

२) कराराचा कालावधी दिनांक ११ ऑगस्ट २०२६ ते दिनांक १० ऑगस्ट २०२७ असेल.

३) संबंधित ठेकेदारांनी उद्वाहनाची प्रत्यक्ष पाहणी करुनच दरपत्रक सादर करावे. दरपत्रकात सर्व करांसह एकूण वार्षिक रक्कम नमूद करावी.

४) दरपत्रके दि.०४/०८/२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मध्यवर्ती कार्यालय, प्रभादेवी, मुंबई येथे बंद लिफाफ्यात सादर करावीत. प्राप्त दरपत्रके दि.०५/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील.

५) शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन निर्णय / परिपत्रके / मार्गदर्शक सूचना / अध्यादेश यांच्या अधीन राहून उद्वाहनाची देखभाल व दुरुस्ती करणे संबंधित ठेकेदारास बंधनकारक राहील.

६) संबंधित शासकीय प्राधिकरणाकडून उद्वाहनाची आवश्यक तपासणी (Inspection) करून घेणे तसेच इतर आवश्यक वैधानिक मान्यता घेण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.

७) प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उद्वाहनाची नियमित देखभाल व दुरुस्ती कामे करावी. तसेच मंडळाच्या सूचनेनुसार आवश्यकतेनुसार अतिरिक्त देखभाल व दुरुस्तीची कामे करावी लागतील. देखभाल व दुरुस्ती कामे सुरू करण्यापूर्वी बांधकाम शाखेस पूर्वकल्पना देणे आवश्यक राहील. तसेच संबंधित ठेकेदाराने दरमहा देखभाल व दुरुस्तीचा दरमहा अहवाल सादर करावा.

८) सदर वार्षिक देखभाल व दुरुस्ती ठेका Semi Comprehensive स्वरूपाचा असून नियमित देखभाल व दुरुस्तीसह खालील नमूद भाग (पाट्र्स) विनाशुल्क बदलून देणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

- Control Small Parts (Phase reversal unit, overload, ply relay etc.)
- Floor Relays.
- Lock Contact (Not a Completing Lock)
- Car Operating Panel Parts (Not a complete panel board)
- Landing Buttons (Not a complete box)
- Floor Switches
- Speed Governor Roller
- Break Liners

९) खालील सुटे भाग(पाट्र्स) या वार्षिक देखभाल करारात समाविष्ट राहणार नाहीत .

- Motor & Machine Complete
- Main Rope & Safety Rope
- Landing Automatic Doors
- Cabin & Car Door with operator
- Car & Landing Seal
- Door Drive & Door Motor
- Car Door Belt
- Control Main Card & Rectifier Card
- Break Coil
- Transformers
- Travelling Cable & 3 Phase Cables
- Logic Board & Power Supply Card
- ELCB & Main Switch
- Fan & Tube Light
- V3F Drive

१०) मुद्दा क्र.९ मध्ये नमूद केलेले सुटे भाग (पार्टस्) खराब झाल्यास संबंधित ठेकेदाराने त्याबाबतचा अपेक्षित खर्च नमूद करून लेखी प्रस्ताव मंडळास सादर करावा. मंडळाची पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतरच संबंधित साहित्याची खरेदी करावी. अशा सुट्या भागांच्या खर्चाची प्रतीपूर्ती मंडळातर्फे येईल. तथापी, सदर भाग(पार्टस्) बदलण्यासाठी कोणतीही अतिरिक्त मजुरी देय राहणार नाही.

११) ठेकेदारास दोन टप्प्यात देयक अदा करण्यात येईल. पहिल्या टप्प्यातील ११ ऑगस्ट २०२६ ते १० फेब्रुवारी २०२७ या कालावधीतील देयक फेब्रुवारी/मार्च २०२७ मध्ये आणि दुसऱ्या टप्प्यातील ११ फेब्रुवारी २०२७ ते १० ऑगस्ट २०२७ या कालावधीतील देयक ऑगस्ट/सप्टेंबर २०२७ मध्ये अदा केले जाईल.

१२) कार्यादेशातील नमूद सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित ठेकेदाराने रु.१००/- च्या मुद्रांक कागदावर (Stamp Paper) हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१३) कामाचा दर्जा समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सदर करार रद्द करण्याचा अधिकार मंडळास राहील.

प्राप्त दरपत्रके स्वीकारणे, तसेच कोणतीही पूर्वसूचना न देता दरपत्रक नाकारण्याचा / रद्द करण्याचा अधिकार मा. कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्याकडे राहील.

सहायक कल्याण आयुक्त

अति.कार्य. (बांधकाम शाखा)